# नावीन्याचा शोध घेत राहा : काटकर

पुणे : विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला नवनिर्मितीची जोड मिळायला हवी. दुसऱ्याला कॉपी करून यश कधीच मिळू शकत नाही आणि मिळाले तरी ते टिकत नाही. त्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत नावीन्याचा शोध घेत कार्यरत राहावे, असा सल्ला 'विवकहिल फाउंडेशन'चे संस्थापक अध्यक्ष कैलास काटकर यांनी विद्यार्थ्यांना दिला. 'घे भरारी' कार्यक्रमांतर्गत 'पंख'च्या संस्थापिका स्मिता आपटे यांनी काटकर यांची प्रकट मुलाखत घेतली. या वेळी अक्षर भारतीच्या वतीने देहू येथील संत तुकाराम विद्यालय आणि जिजाबाई कन्या विद्यालय या शाळांना पुस्तके भेट देण्यात आली. फाउंडेशनचे सीएसआर प्रमुख अजय शिर्के, 'पंख'च्या विश्वस्त कल्याणी भावड, पूजा यांदे, मुख्याध्यापक विठ्ठल कदम, मुख्याध्यापिका शुभांगी पंडित, समुपदेशक सचिन करंजुळे उपस्थित होते.